




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २३५ ●सोमवार,दि.२४ नोव्हेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955







# बीड शहरात स्मिता वाघमारे पडू लागल्या सर्वांवर भारी

# नियोजनबद्ध प्रचार यंत्रणेमुळे तुतारी मनामनात




## तीस वर्ष नगरसेवक, उपनगराध्यक्ष पदाच्या अनुभवाची शिदोरी पाठीशी असल्याने मतदारांची पसंती

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपरिषद निवडणूक प्रचाराला गती आली असून, राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) पक्षाच्या उमेदवार स्मिता विष्णू वाघमारे या सवारवर भारी पडताना दिसत असून, नियोजनबद्ध प्रचार यंत्रणेमुळे त्यांचे निवडणूक चिन्ह तुतारी वाजविणारा माणूस मनामनात पोहोचला आहे. तर तब्बल ३० वर्ष नगरसेवक आणि उपनगराध्यक्ष पदाच्या अनुभवाची शिदोरी त्यांच्या पाठीशी आहे. यामुळे त्यांना मतदारांची पहिली पसंती मिळत असल्याने त्यांच्या पाठीशी सवारना सोबत घेऊन जाणारा पक्ष आणि आ. संदीप क्षीरसागर यांचे बळ असल्याने त्यांचा विजय सोपा असल्याची चर्चा मतदारांमध्ये सुरू आहे. बीड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) पक्षाच्या नगराध्यक्षपदाच्या अधिकृत उमेदवार स्मिता विष्णू वाघमारे या आहेत. त्या मागील ३० वषारपासून सलग ६ वेळा नगरसेवक म्हणून त्या विजयी झालेल्या आहेत. या काळात त्यांनी सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून समाज हिताची कामे केली आहेत. तर विष्णू वाघमारे हे अभ्यासू आणि शांत, संयमी नेतृत्व म्हणून बीडकरांना परिचित आहेत. या दांपत्याने आपली राजकीय पदाचा आणि ताकदीचा वापर केवळ सर्वसामान्यांच्या हितासाठी केलेला आहे. याची जाणीव बीडकरांना असल्याने शहरातील प्रत्येक कोपऱ्यात आणि गल्लीबोळात त्यांना मतदारांचा प्रतिसाद मिळत असून, बीडकरांची पहिली पसंती स्मिता वाघमारे यांनाच आहे. त्यांच्या नगराध्यक्ष काळात त्यांच्या अनुभवाचा फायदा होणार असून, यामुळे शहरवासियांची समस्या मधून सुटका होणार अशी चर्चा सुरू आहे. तर आ. संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वाचा फायदा होणार आहे. मागील ▶▶ उर्वरित पान २ वर

# खा.बजरंग सोनवणेंच्या पाठपुराव्यामुळे तीन रस्त्यांसाठी 40 कोटींचा निधी मंजूर

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यात रस्त्यांचे जाळे निर्माण व्हावे, दर्जेदार रस्ते होऊन दळणवळणाला चालना मिळावी, यासाठी खा.बजरंग सोनवणे प्रयत्न करत असून जिल्ह्यातील तीन रस्त्यांसाठी केंद्रीय रस्ते आणि पायाभूत सुविधा निधी योजनेतून ४० कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामुळे महत्वाच्या रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागणार असल्याने दळणवळणाला चालना मिळणार आहे. बीड जिल्ह्याच्या विकासासाठी खा.बजरंग सोनवणे हे अथक प्रयत्न करत आहेत. रेल्वे, विमानतळासोबत जिल्ह्यातील रस्त्यांची सुधारणा व्हावी, दर्जेदार कामे व्हावीत आणि अर्धवट असलेली कामे पुर्ण करावेत, यासाठी ते वारंवार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेवून पाठपुरावा करत आहेत. केंद्रीय रस्ते आणि पायाभूत सुविधा निधी योजनेतून उंदरी- जानेगाव- कुंबफळ-येडेश्वरी साखर कारखाना ते रामा ६४ रस्ता सुधारणा करणे या कामासाठी २० कोटी, आपेगाव कारण- पिंपरी-निमगाव आर्वी- पाडळी-रायमोहा-तांबाराजुरी रस्ता रामा ६२ या रस्त्याची सुधारणा करण्यासाठी १० कोटी रूपये तर अंबाजोगाई-मांडवा-मांडखेल-नात्रा, कोडगाव रस्ता रामा २३५ मध्ये नाली संरक्षण भित व पुलाचे बांधकाम करणे या कामासाठी १० कोटी रूपये केंद्रीय रस्ते आणि पायाभूत सुविधा निधी योजनेतून मंजूर करण्यात आले आहेत. केंद्रीय रस्ते विकासमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे या रस्त्यांसाठी खा.सोनवणे यांनी भेट घेवून पत्र दिले होते. दरम्यान, केंद्रीय सीआरआयएफ योजनेंतर्गत ४० कोटींच्या निधीस मंजूरी ▶▶ उर्वरित पान २ वर

लग्नाला वर्षही झालं नाही, नवऱ्याचे अनैतिक संबंध, मोबाईलमधील चॅटिंग वाचलं अन्...

# गौरी गर्जेंनी टोकाचं पाऊल उचललं

**मुंबई । प्रतिनिधी**



भाजपच्या नेत्या आणि राज्याच्या पर्यावरण तथा पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या स्वीय सहाय्यक अनंत गर्जे यांच्या पत्नीने मुंबईतील घरात काल (शनिवारी, ता२२) टोकाचं पाऊल उचलल्याची माहिती समोर आली आहे. अनंत गर्जे यांच्या पत्नी डॉक्टर गौरी पालवे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अनंत गर्जे आणि डॉक्टर गौरी पालवे यांचा ७ फेब्रुवारी रोजी विवाह झाला होता. लग्नानंतर अवघ्या दहा महिन्यात त्यांनी वरळीतील राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची माहिती समोर आली आहे. काल सायंकाळी सात वाजता घरात गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. कौटुंबिक वादातून ही आत्महत्या झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या प्रकरणी वरळी पोलिसानी अपमृत्यूची नोंद केली असून मृतदेह शवविच्छेदनासाठी केईएम रुग्णालयात पाठवला आहे. वरळी बीडीडी येथे गौरी रहात होत्या, त्या केईएम रुग्णालय डेटिस विभागात कार्यरत होत्या. तर गेल्या अनेक दिवसांपासून घरात वाद सुरु होते, गौरी गर्जे यांना संशय होता नवऱ्याचे बाहेरच्या महिलेशी अनैतिक संबंध आहेत, यावरुन दोघांमध्ये भांडणं व्हायची, त्या मानसिक तणावात होत्या, केईएम रुग्णालयातील दंतवैद्यक विभागात त्या कार्यरत होत्या. या प्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, पंकजा मुंडे यांच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

**● पंकजा मुंडे यांनी आपले बीडमधील सर्व कार्यक्रम रद्द केल्याची माहिती**

**काही महिन्यापूर्वीच त्यांचं लग्न झालं होतं. या घटनेनंतर पंकजा मुंडे यांनी आपले बीडमधील सर्व कार्यक्रम रद्द केल्याची माहिती आहे. मृतदेह रुग्णालयात असून त्यावर पोस्टपार्टम केले जाणार आहे. पोस्टमार्टममधून सत्य बाहेर येईल, असे सांगितले जात आहे. दरम्यान, पोलिस या प्रकरणी अधिक तपास करत आहेत.**

# जरांगेंच्या समर्थकाचा संशयास्पद मृत्यू; गाडीत पोलीस वर्दी आढळली अन्..; नेमकं पकाय घडलं?



**बीड । प्रतिनिधी**

दासखेड फाटा (ता. पाटोदा) इथे शनिवारी रात्री उशिरा अपघातात झाला. या अपघातात मराठा आरक्षणासाठी सक्रिय असलेले अतुल घरत (रा. महाजनवाडी, बीड) यांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. पण या अपघाताची पद्धत, कारवरील लिहिलेला मजकूर आणि गाडीत आढळलेली पोलिसांची वर्दी यामुळे हा अपघात नसून घातपात झाल्याचा संशय लोकांमध्ये पसरला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, अतुल घरत हे दुचाकीवरून घरी जात होते. तेवढ्यात स्विफ्ट कारने त्यांच्या बाईकला जोरदार धडक दिली. धडक इतकी प्रचंड होती की अतुल घरत गंभीर जखमी झाले. आसपासच्या लोकांनी तात्काळ मदत करत त्यांना हॉस्पिटलला नेत असतानाच त्यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर त्या कारवर अण्णा असा मजकूर लिहिलेला दिसला. त्यातच गाडीत पोलिसाची वर्दीही आढळली, अशी माहिती समोर आली. ▶▶ उर्वरित पान २ वर

# अंबाजोगाईतील नवीन जिल्हा कारागृह उभारणीच्या प्रक्रियेला वेग; काळवटी तांडा येथील 30 एकर जमिनीचा शासनाने दिला ताबा

## आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात नवे, अत्याधुनिक जिल्हा कारागृह अंबाजोगाई येथे उभारण्यासाठीचा महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. अंबाजोगाई लगतच्या मौजे काळवटी, लमाण तांडा येथील सर्वे नं. १/अ/५ मधील ३० एकर शासकीय गायरान जमीन कारागृह विभागास प्रदान करण्यास राज्य शासनाने अधिकृत मान्यता दिली आहे. शासनाचा हा आदेश जाहीर झाल्याने अंबाजोगाईतील कारागृह प्रकल्पाच्या कामाला आता प्रत्यक्ष गती मिळणार आहे. गृह विभागास जमीन प्रदान करण्याचा प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत शासनाकडे पाठविण्यात आला होता. त्यावर निर्णय घेत शासनाने जमीन प्रदान करण्यास मंजुरी दिली. अंबाजोगाईतील जुने उपजिल्हा कारागृह इमारत नादुरुस्त झाल्यामुळे फार वर्षांपूर्वी बंद करण्यात आले होते. त्यानंतर शहरात ▶▶ उर्वरित पान २ वर






# आज वैष्णव पॅलेस येथे अजित दादा पवार यांच्या उपस्थितीत व्यापारी मेळावा

## व्यापारी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे : अमर नाईकवाडे (शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, बीड)

**बीड । प्रतिनिधी**



बीड नगरपरिषदेच्या निवडणूक वातावरणाला वेग आला असताना, राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित दादा पवार यांचा बीड शहर दौरा अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे. वैष्णव पॅलेस, बीड येथे आज सोमवार सायंकाळी ५ वाजता आयोजित व्यापारी मेळाव्यात अजित दादा पवार हे शहरातील व्यापारी बांधवांशी थेट संवाद साधणार असून, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा संवाद विशेष लक्षवेधी ठरणार आहे.या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अमर नाईकवाडे यांनी पत्रकाद्वारे माहिती देताना सांगितले की, शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व ५३ उमेदवारांना बळकटी देण्यासाठी, तसेच व्यापारी ▶▶ उर्वरित पान २ वर

# विनोद मुळूक यांनी केलेल्या विकास कामाला मतदार विसरतील का ? 'एक कॉल अडचणी स्वाल!'


४५ पैकी ९ नगर सेवक रस्त्यावर; बाकी झोपले





**बीड । प्रतिनिधी**

गेल्या पंधरा वर्षापासून मा. सभापती तथा नगरसेवक विनोद मुळूक यांनी केलेल्या कामाची दखल सर्वसामान्य मतदार घेणार नाहीत का? असावा सवाल सर्वसामान्य जनताच आता करू लागली आहे. त्यामुळे मा. सभापती तथा नगरसेवक विनोद मुळूक यांचा प्रचार नागरिकच करू लागले आहेत. त्यामुळे विनोद मुळूक हे प्रचंड बहुमताने निवडून येण्याची शक्यता आहे. कारण कोरोना काळामध्ये अनेक नगरसेवक झोपा काढत होते. घराच्या बाहेर कोणी येत नव्होते. त्यामध्ये ठराविक चारच नगरसेवक अमर नाना नाईकवाडे, विनोद मुळूक हे रस्त्यावर उतरून जनसामान्यांची सेवा करत होते. कोरोना काळामध्ये कोरोना झाल्यानंतर भाऊ सुद्धा भावाला विचारीत नव्हता व बापाची अंत्यविधीला मुलगा जात नव्हता. अशी परिस्थिती असताना विनोद मुळक यांनी सर्वसामान्य जनतेची एक निष्ठेने सेवा केली व त्यांना हॉस्पिटलला उपचार घेण्यासाठी दाखल करत होते. त्यांच्या जेवणाची सोय, आवश्यक औषधं ची सोय विनोद मुळूक यांनी कोरोना काळातील केली. तसेच बीड शहरातील विनोद मुळूक यांचा वार्ड म्हणजे जणू काही आपण बाहेर सिटीत आलो आहोत की काय असे वाटत आहे. विनोद मुळूक यांनी सरवतो परी इमाने इतबारे विकास केल्याने सर्व सामान्य मतदारणीच त्यांची प्रचाराची धुरा हाती घेतल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे विनोद मुळूक हे प्रचंड बहू मताने निवडून येतील असे नागरिकांमध्ये बोलले जात आहे.

# प्रतिजैविक प्रतिकारशक्ती : आपल्या आरोग्याला वाढता अदृश्य धोका औषधे काम करेनाशी का झाली? 'ए एम आर'चे धोकादायक वास्तव

ए एम आर म्हणजे प्रतिजैविक प्रतिकारशक्ती : ए एम आर म्हणजे अँटी मायक्रोबियल रेसिस्टन्स म्हणजेच प्रतिजैविक प्रतिकारशक्ती ही आजच्या जगासाठी वाढत चाललेली गंभीर आरोग्य समस्या आहे . सूक्ष्मजंतू जसे बॅक्टेरिया , फंगस आणि परजीवी हे औषधांच्या प्रभावाला विरोध करण्याची क्षमता विकसित करतात तेव्हा औषधे पूर्वीसारखी काम करत नाहीत . याचा अर्थ असा की साध्या अँटीबायोटिक्स नेदेखील उपचार करणे कठीण होत चालले आहे . डॉक्टरांनी दिलेली औषधे अर्धवट घेणे , स्वतःहून औषधे वापरणे , शेती आणि पशुपालनात अँटीबायोटिक्स चा अति वापर होणे , रुग्णालयांतील संक्रमण नियंत्रणातील त्रुटी , स्वच्छतेचा अभाव आणि पर्यावरणातील प्रदूषण यामुळे ए एम आर वाढण्याचा वेग अधिकच वाढतो आहे . सूक्ष्मजंतू सतत बदलतात आणि स्वतःचे रक्षण करण्यासाठी नवे मार्ग शोधतात . काही बॅक्टेरिया औषधाला निष्क्रिय करतात , काही औषध पेशीबाहेर फेकून देतात , तर काही औषधाचा लक्ष्यबिंदू बदलतात . यामुळे सूक्ष्मजंतू अधिक घातक आणि प्रतिरोधक बनतात .

जागतिक स्तरावरील ए एम आर चे संकट : जागतिक आरोग्य संघटनेनुसार ए एम आर मुळे दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो . हा एक ' सायलेंट पँडेमिक ' मानला जातो. कारण ए एम आर हळूहळू वाढतो पण परिणाम अत्यंत गंभीर असतात . क्षयरोग , मलेरिया , न्यूमोनिया , मूत्रमार्ग संक्रमण , रुग्णालयातील संक्रमण आणि शस्त्रक्रियेनंतर होणारे संक्रमण या सर्वांमध्ये प्रतिजैविक प्रतिकारशक्ती झपाट्याने वाढत आहे . पूर्वी साध्या उपचारांनी नियंत्रणात येणारे संक्रमण आता गुंतागुंतीचे , खर्चिक आणि आय सी यू पातळीवरील औषधांची मागणी करणारे झाले आहेत . नवजात बालके , वृद्ध , कर्करोग उपचार घेत असलेले आणि कमी रोगप्रतिकारक शक्ती असलेले रुग्ण यांच्यासाठी ही समस्या विशेषतः धोकादायक ठरते .

भारतामधील ए एम आर ची स्थिती : भारत हा जगातील सर्वाधिक प्रतिजैविक वापर करणारा देश आहे . अनेक लोक सर्दी , खोकला , ताप यांसारख्या व्हायरल आजारांवरही अँटीबायोटिक्स घेतात , परंतु अशा आजारांवर प्रतिजैविकांचा काही उपयोग होत नाही . अशा चुकीच्या वापरामुळे बॅक्टेरिया अधिक प्रतिरोधक होत जातात . भारतात मूत्रमार्ग संक्रमण , टायफॉइड , न्यूमोनिया आणि क्षयरोग यांसाठी वापरली जाणारी अनेक औषधे आता पूर्वीइतकी प्रभावी राहिली नाहीत . रुग्णालयांतील संक्रमण , जनावरांमध्ये होणारा अनियंत्रित औषधवापर , अन्नपदार्थांतून शरीरात जाणारे प्रतिजैविक अवशेष आणि पर्यावरणातील दूषण या कारणांमुळे भारतातील ए एम आर चे संकट अधिक तीव्र बनते .

ए एम आर आठवडा : दरवर्षी १८ ते २४ नोव्हेंबर हा ' जागतिक प्रतिजैविक जागरूकता आठवडा ' म्हणून साजरा केला जातो . या आठवड्याचा उद्देश मानव , प्राणी आणि पर्यावरण या तिन्ही क्षेत्रांमध्ये प्रतिजैविकांचा योग्य वापर आणि ए एम आर चा धोका याबाबत व्यापक जनजागृती करणे हा आहे . आरोग्य



संस्था , पशुवैद्य , कृषी विभाग , पर्यावरण संस्था , शाळा–महाविद्यालये व स्थानिक यंत्रणा यांच्या सहकार्याने जनजागृती कार्यक्रम , कार्यशाळा , मोहिमा आणि प्रचार उपक्रम राबवले जातात . लोकांना औषधे कधी घ्यायची , कधी नाही , औषधांचा कोर्स का पूर्ण करायचा आणि प्रतिकारशक्ती कशी वाढते याबद्दल सोप्या भाषेत समजावले जाते .

थीम : ॲक्ट नाऊ : प्रोटेक्ट अवर प्रेझेंट , सिक्युअर अवर फ्युचर : २०२५ च्या जागतिक ए एम आर आठवड्याची थीम आहे ' ॲक्ट नाऊ : प्रोटेक्ट अवर प्रेझेंट , सिक्युअर अवर फ्युचर ' . या घोषवाक्यातून स्पष्ट संदेश दिला जातो की प्रतिजैविक प्रतिकारशक्ती ही भविष्याची समस्या नसून आजचीच तातडीची आरोग्य समस्या आहे . आजच प्रतिजैविकांचा चुकीचा वापर थांबवला नाही , स्वच्छतेच्या सवयी पाळल्या नाहीत , पशुपालन व पर्यावरणातील औषधनियंत्रण सुधारले नाही तर भविष्यात सामान्य औषधेही प्रभावहीन ठरतील . या थीम मध्ये मानव , प्राणी आणि पर्यावरण यांच्या आरोग्याकडे एकत्रितपणे पाहण्याचा ' वन हेल्थ ' दृष्टिकोन अधोरेखित केला आहे .

सूक्ष्मजंतू प्रतिकारशक्ती कशी विकसित करतात : बॅक्टेरिया अतिशय वेगाने वाढतात आणि बदलतात . औषधांनी मारले गेले तरी काही बॅक्टेरिया जिवंत राहतात आणि पुढील पिढ्यांमध्ये अधिक शक्तिशाली होतात . काही औषधाची रासायनिक रचना बदलून ते औषध निष्क्रिय करतात , काही औषध पेशीतून बाहेर फेकून देतात आणि काही औषधाचा लक्ष्यबिंदू बदलतात . धोकादायक बाब म्हणजे एक बॅक्टेरिया प्रतिकारशक्ती विकसित करतो तेव्हा तो प्रतिकार असलेले जीन इतर बॅक्टेरियाला देऊ शकतो . त्यामुळे प्रतिकारशक्ती अत्यंत वेगाने पसरते .

पशुपालन , शेती आणि ए एम आर : शेती आणि पशुपालनात वाढ वाढवण्यासाठी व संक्रमण टाळण्यासाठी अँटीबायोटिक्स चा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो . त्या औषधांचे अवशेष दूध , मांस , अंडी , माती आणि पाण्यातून मानवी शरीरात पोहोचतात . यामुळे बॅक्टेरिया आणखी प्रतिरोधक बनतात . ही प्रक्रिया ' वन हेल्थ ' या संकल्पनेनुसार मानव , प्राणी आणि पर्यावरण या तीनही स्तरांवरील आरोग्याचे थेट परस्परसंबंध दाखवते .

ए एम आर चे दुष्परिणाम : साधे संक्रमणही जीवघेणे बनणे , शस्त्रक्रियांना धोका वाढणे , कर्करोग उपचारादरम्यान संसर्ग वाढणे , महागडी औषधे लागणे आणि आरोग्यव्यवस्थेवर मोठा भार येणे हे ए एम आर चे गंभीर दुष्परिणाम आहेत . भविष्यात दंतउपचार , सिझेरियन प्रसूती किंवा अगदी साध्या शस्त्रक्रियाही धोकादायक ठरू शकतात .

ए एम आर रोखण्यासाठी उपाय : फक्त डॉक्टरांनी सांगितलेलीच औषधे घ्यावीत , औषधांचा कोर्स पूर्ण करावा , सर्दी–खोकल्यासारख्या व्हायरल आजारांवर अँटीबायोटिक्स घेऊ नयेत , शिल्लक औषधे इतरांना देऊ नयेत , हात स्वच्छ धुणे , सुरक्षित पाणी वापरणे , रुग्णालयांतील संक्रमण नियंत्रणाचे नियम पाळणे , पशुपालनात औषधांचा जबाबदार वापर करणे आणि समाजात जागरूकता वाढवणे हे ए एम आर विरोधातील सर्वात प्रभावी उपाय आहेत . कृत्रिम बुद्धिमत्ता , फेज थेरपी , जीन एडिटिंग यांसारख्या उपाययोजनांवर संशोधन सुरू असले तरी सध्या सर्वात प्रभावी पाऊल म्हणजे जबाबदार औषधवापर आणि स्वच्छतेची सवय . ए एम आर हे उद्याचे नव्हे , तर आजचेच अत्यंत गंभीर संकट आहे . औषधांचा चुकीचा किंवा अतिरेकी वापर मानवजातीच्या आरोग्यावर थेट परिणाम करणारा धोका आहे . स्वच्छता , जबाबदार औषधवापर , योग्य उपचार आणि सामूहिक जागरूकता या चार गोष्टींच्या आधारेच आपण ए एम आर विरोधातील लढाई जिंकू शकतो . मानव , प्राणी आणि पर्यावरण यांचे एकत्रित आरोग्य लक्षात घेऊन ' वन हेल्थ ' दृष्टिकोनातून प्रयत्न केल्यास हे संकट नक्कीच रोखता येईल .

– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके
तहसीलदार बीड.

◆ पान १ वरून पुढे...

## बीड शहरात ...

प्रशासकाच्या काळात आज विकासे अवसान आणणारे घरात बसलेले असताना संदीप क्षीरसागर हे रस्त्यावर होते. त्यांनी शहरातील नागरिकांच्या काळजीपोटी प्रत्येक काम स्वत... उभे राहून करुन घेतले आहे. हे पाहता स्मिता विष्णू वाघमारे यांना दलित, मुस्लिम आदी मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. यामुळे त्यांचा विजय सोपा होणार असल्याची चर्चा आहे.

## खा.बजरंग...

मिळाली असून यानिधीमुळे बीड जिल्ह्यातील महत्वाच्या रस्ते उन्नतीकरणे व विकासकामांना आता गती मिळणार आहे. या सकारात्मक निर्णयाबद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आभार, अशी शब्दात खा.बजरंग सोनवणे यांनी भावना व्यक्त केली आहे. बीड जिल्ह्यातील या तिनही रस्त्यांची अत्यंत अवश्यकता आहे. रस्त्यांची सुधारणा व्हावी, अशी अनेक वर्षांपासून मागणी होती. जनभावना लक्षात घेवून खा.सोनवणे यांनी रस्त्याचा प्रश्न लावून धरला होता. अखेर या रस्त्यांच्या सुधारणासाठी निधी मंजूर झाल्याने या रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

## लग्नाला वर्षही....

स्वीय सहाय्यकाच्या पत्नीने आत्महत्या केल्याची घटना समोर येताच खळबळ उडाली. डॉ. गौरी गर्जे असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे. १० महिन्यांपूर्वीच पीए अनंत गर्जे आणि गौरी गर्जे यांचा विवाह झाला

◆ पान १ वरून पुढे...

होता. तर अनंत गर्जे यांचे बाहेर अफेअर असल्याचा संशय असल्याने गौरी गर्जे या अस्वस्थ असल्याची माहिती समोर आली आहे.नवऱ्याचे बाहेरच्या महिलेशी अनैतिक संबंध आहेत, यावरुन दोघांमध्ये भांडणं व्हायची, त्या मानसिक तणावात होत्या,
अनंत गर्जे आणि डॉक्टर गौरी पालवे यांच्या लग्नाला देखील पंकजा मुंडे आपली बहीण प्रीतम मुंडेसह गेल्या होत्या, मोठ्या थाटामाटात ७ फेब्रुवारीला लग्न झालं होतं. अवघ्या दहा महिन्यांचा संसारात नेमकं काय घडलं, त्यांनी असं टोकाचं पाऊल का उचललं याच्या चर्चा सध्या सुरू आहेत. या घटनेनं हळहळ व्यक्त होत आहे, तर अनंत गर्जे यांचे अफेअर असल्याने गौरी गर्जे या अस्वस्थ असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच गौरी गर्जे यांचा सासरच्या मंडळींकडून छळ होत होता, असा आरोप देखील त्यांच्या कुटुंबियांनी केला आहे. वरळी पोलिसांनी घटनास्थळी जाऊन मृतदेह ताब्यात घेतला, शवविच्छेदनासाठी केईएम रुग्णालयात पाठवला आहे, कुटुंबीयांची चौकशी सुरु आहे, अपमृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरु आहे.
डॉक्टर गौरी पालवे यांच्या मामाने बोलताना सांगितले की, काल दुपारी एक वाजल्यापासून त्यांची भांडणं सुरू होती. अनंत गर्जेचे बाहेर संबध होते. हे तिला माहिती होतं. तिने त्याकडे दुर्लक्ष केलं. तिने त्याचे चॅटींग देखील पाहिले होते. ते तिच्या वडिलांना पाठवून ठेवले होते. अनंत सांगतोय की तिने माझ्यासमोर आत्महत्या केली. मात्र, आमचा विश्वास नाही. पोलिसांनी गुन्हा दाखल करावा. माझी बहीण, मुलीचे वडील कालपासून पोलिस ठाण्यात बसून आहे. सामान्य लोकांना न्याय मिळत नाही. गौरीच्या वडीलांकडे चॅटींगचे पुरावे आहेत, असंही त्यांनी सांगितलं आहे.

◆ पान १ वरून पुढे...

## जरांगेंच्या समर्थकाचा...

त्यामुळे हा साधा अपघात नसून जाणीवपूर्वक केलेला घातपात असू शकतो, असा संशय स्थानिक लोकांना आणि सोशल मीडियावर व्यक्त केला जात आहे. त्यात भर म्हणजे अपघात झाल्यानंतर कारचा चालक अपघातानंतर पळून गेला. अतुल घरत मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थक होता. सोबतच तो मराठा आरक्षणाच्या लढाईत सक्रीय सहभागी होता. दरम्यान त्याचा असा मृत्यू झाल्याने परिसरात संताप आणि चर्चा वाढल्या आहेत. अनेकांनी फरार चालकाला तात्काळ पकडून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पोलीस या प्रकरणाचा तपास करत असून, घटनास्थळाचा पंचनामा पूर्ण झाला आहे. गाडीचा नंबर, कारवरील लिहिलेला मजकूर आणि वर्दी याबाबत अधिक चौकशी सुरू असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे

## अंबाजोगाईतील नवीन...

आधुनिक, सुरक्षित व सक्षम कारागृहाची गरज तीव्र बनली होती. तत्कालीन पालकमंत्री स्व. विमल मुंदडा यांच्या कार्यकाळात या प्रकल्पाचा प्रारंभिक प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर झाला होता. पुढील प्रक्रियेला गती देण्यासाठी जागा निवड, मोजणी व नकाशे तयार करण्याची कामे पूर्ण झाली होती. या संपूर्ण उपक्रमाला निर्णायक वळण मिळवून देण्यात आ. नमिता मुंदडा यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. जिल्हा कारागृहावर वाढता ताण, अंबाजोगाई व आसपासच्या तालुक्यातील आरोपींची दररोज होणारी बीड जिल्हा कारागृहापर्यंतची धावपळ, सुरक्षाविषयक कारणे आणि न्यायिक प्रक्रियेतील विलंब या सगळ्या प्रश्नांकडे त्यांनी शासनाचे लक्ष

◆ पान १ वरून पुढे...

वेधले. वारंवार पाठपुरावा करून शासन पातळीवर हा विषय प्राधान्यक्रमात आणला. गतवर्षी काळवटी तांडा परिसरातील जागेची मोजणी पूर्ण होऊन नकाशा तयार झाल्यानंतर प्रशासकीय मान्यतेसाठी कारागृह प्रशासनाला जमिनीचा ताबा देणे आवश्यक होते. यासाठी आ. नमिता मुंदडा यांनी घेतलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा निर्णायक ठरला. त्यानुसार यापूर्वी राज्य शासनाने जमिनीचा आगाऊ ताबा कारागृह विभागास देण्याचे आदेश दिले आणि आता शासनाने जमीन अधिकृतरीत्या प्रदान करण्याची मंजुरीही जाहीर केली आहे. जिल्हा स्तरावर लवकरच हस्तांतरणाची औपचारिक कार्यवाही पूर्ण होणार असून अंबाजोगाईत अत्याधुनिक कारागृह उभारणीचा मार्ग पूर्णपणे मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे सध्याच्या बीड येथील जिल्हा कारागृहावरील ताण कमी होणार आहे. या निर्णयाबद्दल आ. नमिता मुंदडा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.

## आज वैष्णव....

बांधवांच्या विविध प्रश्नांना उत्तर देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर मार्गदर्शन करणार आहेत. हा व्यापारी मेळावा म्हणजे केवळ संवाद नव्हे, तर बीडच्या व्यापारी वर्गासाठी दिशा ठरवणारा निर्णायक टप्पा आहे. त्यामुळे शहरातील सर्व व्यापारी बांधवांनी, व्यावसायिक संघटनांनी तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन शहराध्यक्ष अमर नाईकवाडे यांनी केले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## श्री दत्त....

महोत्सव साजरा होणार असून श्री दत्त जन्मोत्सव सोहळ्याचे हे २५ वे वर्षे आहे. श्री दत्त जयंतीनिमित्त आयोजित या किर्तन महोत्सवात शुक्रवार दि.२८ नोव्हेंबर रोजी हभप मधुकर महाराज डोईफोडे, शनिवार दि.२९ नोव्हेंबर रोजी हभप गुरूवर्य महादेव महाराज चाकरवाडीकर, रविवार दि.३० नोव्हेंबर रोजी हभप अभिषेक महाराज मेटे (आळंदी देवाची), सोमवार दि.०१ डिसेंबर रोजी हभप हनुमान महाराज डांबे – आळंदी, मंगळवार दि.०२ डिसेंबर रोजी हभप भगवंत महाराज गोंदीकर, बुधवार दि.०३ डिसेंबर रोजी हभप राजेंद्र महाराज वाघमारे (आळंदी देवाची), गुरुवार दि.०४ डिसेंबर रोजी हभप प्रियंकाताई रूपनर (श्रीक्षेत्र भीमसिंह महाराज संस्थान तिंतरवणी) यांची दररोज रात्री ८ ते १० या वेळेत किर्तनरूपी सेवा समर्पित होणार असून शुक्रवार दि.०५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत हभप सुधाकर महाराज वाघ (पैठण) यांचे सुश्राव्य असे काल्याचे किर्तन संपन्न होऊन त्यानंतर महाप्रसादाचे वाटप होणार आहे. या किर्तन महोत्सवात गायनाचार्य म्हणून भाऊसाहेब महाराज माखले, रामप्रसाद महाराज पिंपळे, दत्ता महाराज शिंगणे, अंसाराम म.हात्ते, श्रीमंत महाराज कासकर, जयराम महाराज नाटकर, लक्ष्मण महाराज काळे, कृष्णा महाराज हात्ते यांच्यासह सर्व गुणीजण मंडळ, महिला भजनी मंडळ व कानिफनाथ वारकरी शिक्षण संस्था यांची साथसंगत लाभणार आहे. तसेच पखवाज वादक म्हणून हभप अंकुश महाराज काळे, हभप रमेश महाराज पिंपळे व श्रीराम महाराज उदावंत आणि हार्मोनियम वादक म्हणून दत्ता महाराज शिंगणे व हभप गोदावरीताई हात्ते यांची साथसंगत लाभणार आहे. तरी हभप नवनाथ महाराज गिरी व हभप गणेश महाराज कचरे यांच्या शुभहस्ते व नेतृत्वाखाली संपन्न होणाऱ्या भव्यदिव्य किर्तन महोत्सवाचा लाभ तलवाडा आणि परिसरातील भाविकांनी घ्यावा असे आवाहन त्वरिता तरूण मंडळ व पावन दत्त मंदिर संस्थान समितीच्या वतीने या संस्थानचे अध्यक्ष – बापू गाडेकर यांनी केले आहे.

## जनावरेही खाणार...

आहे. तलवाडा येथे निकृष्ट दर्जाचा माल वितरीत करण्याचा प्रकार सुरु असल्याने लाभार्थ्यात प्रचंड रोष निर्माण झाला आहे. या वितरित धान्यापैकी जाळ्या व कचरा युक्त ज्वारीला अक्षरशः जनावरेही खाणार नाहीत, असे गावकरी सांगत आहेत. आसल्या कचरा युक्त धान्याचे करायचे काय असा सवाल विध्यमान लोकप्रतिनिधी व तहसीलदारांना विचारला जातोय म्हणून लोकप्रतिनिधीने या कडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी नागरिकातुन होत आहे. यावर गेवराईचे तहसीलदार व संबंधित पुरवठा अधिकारी सांगतात की, हा माल आपणांस जेथुन येतो तेथून आसाच येतो. ही बाब लोकप्रतिनिधींनी गांभीर्याने घ्यावे की मोठ्या प्रमाणात निष्कृष्ट धान्य व जुना तांदूळ येतो कुठून हा संशोधनाचा विषय आहे. निष्कृष्ट धान्य तपासण्याची जबाबदारी पुरवठा अधिकारी व निरीक्षण अधिकाऱ्याची आहे. याकरिता शासनाने राजपत्रित अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे. गोदामात माल आल्यानंतर ती पाहण्याची जबाबदारी निरीक्षण अधिकाऱ्याची असते. निरीक्षण केल्यानंतरच धान्य राशन दुकानात जाते. त्यामुळे निरीक्षण अधिकाऱ्यांच्या कार्यप्रणालीवर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. दरम्यान राज्य शासनाने स्वस्त धान्य दुकानात येणारा तांदूळ हा नविनच तांदूळ असावा असा आदेश काढलेला आहे. परंतू येथे नविन तांदळासोबतच जुन्या

◆ पान ४ वरून पुढे...

तांदळाचा पुरवठा करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे तांदूळ पुरवठा व वितरणात गौडबंगाल असल्याचे दिसून येते. स्वस्त धान्य दुकानात पुरवठा करण्यात आलेले धान्य जर निकृष्ट असेल तर स्वस्त धान्य दुकानदारांनी पुरवठा अधिकाऱ्यांना माहिती द्यावी, असे सांगण्यात येते. मात्र, स्वस्त धान्य दुकानदार अशा प्रकारची माहिती सांगत नाहीत. भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली हे चार जिल्हे धान उत्पादक जिल्हे म्हणून प्रसिध्द आहेत. या जिल्ह्यातील तांदूळ स्थानिक गावखेड्यात, तसेच संपूर्ण महाराष्ट्रात वितरीत करण्यात येतो. त्यामुळे या तांदळाचे निरीक्षण व चौकशी करण्याची गरज आहे. तसेच शासकीय आधारभूत खरेदी केंद्रावरील धानाची उचल करुन ती मिलर्स यांना देण्यात येते. मिलर्सकडून तांदूळ शासकीय गोदामात जातो. त्यानंतर स्वस्त धान्य दुकानातून हे तांदूळ वितरीत करण्यात येते. शासकीय धान खरेदी केंद्रातील धान हे चालू हंगामातील असतात. परंतू स्वस्त धान्य दुकानात वितरीत करणारे तांदूळ मात्र हे तीन ते चार वर्षे जुनी – आहेत.

## जिद्द, मेहनत...

मिळवलेल्या इथापे शंकर सोमीनाथ, दातीर रोहन गोरख, अमन लियाकत खान, देवकर करण विठ्ठल, गवते राहुल सुभाष, आंधळे रोहित रामकिसन, पवार ओंकार बद्रीनाथ, सारगुडे समाधान श्रीधर, कवादे सौरभ अण्णा, प्रथमेश भारत यादव, कृष्णा अनिल अंदुरे, बडे धनराज विजय, ऋषिकेश बप्पा राजपुरे, भरत महादेव शिंदे, अर्जुन विजय टोणपे, महेश दत्तात्रय काकडे, नवले प्रतीक नंदराम, सुद्रिक अभिषेक विजय, इरकर कृष्णा शिवदास, टकले सचिन गीताराम, सोनवणे सुदर्शन दादाराम, केकान वैभव आजिनाथ, ज्ञानेश्वर आत्माराम कदम, सोले आदित्य अंकुश, कोठरे माऊली महादेव, पोकळे ओम सुनील, भोसले श्रीराज सिताराम, पावसे विवेक दिनकर, गर्जे हर्षद विठ्ठल, सागर दिनकर गर्जे, बांगर ओंकार दत्तात्रय, देविदास तुकाराम तांबे, हंबर्डे विशाल रोहिदास, शुभम भाऊसाहेब गोंदकर, राहुल कुंडलिक जगताप, सुरज राजेंद्र जगताप, कोल्हे सुरज बाळू, डीसले रोहित अशोक, संदीप शिवाजी गर्जे आणि अविष्कार छगन निकम, महेश कालिदास गरकळ, अभिषेक सुनील गरकळ या सर्वांचा अभिमानाने गौरव करण्यात आला. याशिवाय महाराष्ट्र पोलिस दलात निवड झालेल्या प्रियंका मल्हारी तांबे, घोडके दत्तात्रय गोरख व नागरगोजे किशोर शिवाजी तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलात निवड झालेल्या जाधवर चंद्रकांत बंडू, घुमरे दीपक लक्ष्मण, रायकर सिद्धांत रंगनाथ, रूपवर अशोक गवाजी आणि कुदांडे दत्तात्रय जयसिंग यांचा देखील सन्मान करण्यात आला. कष्ट, जिद्द, चिकाटी आणि सातत्याच्या जोरावर उज्वल यश संपादन करून गाव, समाज व जिल्ह्याचे नाव उज्वल करणाऱ्या या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आ.धस यांनी अभिनंदन केले.

## प्रभाग 6 मधून...

आहे. आतापर्यंत या दोन्ही उमेदवारांनी संपूर्ण प्रभाग पिंजून काढला असून मतदारातून त्यांच्या उमेदवारीचे स्वागत होत आहे. आकाश कराड यांच्या कुटुंबाचा नगरसेवक म्हणून आधीचा कामकाजाचा अनुभव या निवडणुकीत त्यांना मजबूत पार्श्वभूमी मिळवून देत आहे. क्रांती गोस्वामी या प्रथमच निवडणूक लढवत असल्या तरी त्यांचे पती श्रेयस उर्फ शैलेश गोस्वामी यांचा प्रभागात दांडगा जनसंपर्क असल्याने त्यांच्याही उमेदवारीला बळ

◆ पान ४ वरून पुढे...

मिळत आहे. लोकांच्या अडीअडचणीला धावून जाणारा तरुण अशी त्यांची ओळख प्रभागात आहे. यासोबतच त्यांच्या पाठीशी राजकिशोर मोदी ठामपणे उभे असल्याने या दोन्ही उमेदवारांचे निवडणुकीतील पारडे जड आहे. परंतु, काही अपक्ष उमेदवार या ठिकाणी राजकिशोर मोदी यांचा आम्हाला पाठींबा असल्याचे खोटा प्रचार करत असल्याचे निदर्शनास आले आहे. तरी, प्रभागातील मतदारांनी या अपप्रचारला बळी न पडता लोकविकास महाआघाडीचे अधिकृत उमेदवार क्रांती गोस्वामी आणि आकाश कराड यांनाच विजयी करावे असे आवाहन राजकिशोर मोदी यांनी केले आहे.

## वार्ड ७–ब भाजपाचे....

आहे. कुटुंबाची जनसंपर्काची परंपरा, सातत्याने लोकांमध्ये मिसळून समस्या सोडवण्याची वृत्ती आणि वार्डातील विविध प्रश्नांवर वेळोवेळी घेतलेली पुढाकार यामुळे मतदारांमध्ये त्यांच्याबद्दल सकारात्मक लाट दिसत आहे. वार्डातील दैनंदिन समस्या, पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता यांसारख्या मुद्द्यांवर ठोस काम करण्याची भूमिका त्यांनी मांडली आहे. विकासाचे व्हिजन घेऊन प्रभागात कामे उभी करणे, सामान्य नागरिकांचे प्रश्न प्राधान्याने सोडवणे आणि पारदर्शक कारभार ठेवणे हे माझे उद्दिष्ट आहे, असे संतोष सोळंके यांनी सांगितले. प्रचारादरम्यान मतदारांशी संवाद साधताना त्यांनी कमळ या भाजपाच्या चिन्हावर मतदान करून प्रचंड बहुमताने विजय मिळवून देण्याचे आवाहन केले आहे. वार्डातील तरुण, ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग तसेच विविध समाजातील लोकांकडून मिळणारा सहभाग पाहता प्रभाग क्र. ७–ब मध्ये संतोष सोळंके यांची बाजू अधिकाधिक मजबूत होताना दिसत आहे. जनतेचा विश्वास, सातत्याने केलेले सामाजिक उपक्रम आणि घराघरात पोहोचलेली प्रभावी छाप या सर्व कारणांमुळे या प्रभागात संतोष सोळंके यांच्या विजयाची शक्यता अधिक ठळकपणे व्यक्त केली जात आहे.

## विनायक रत्नपारखी....

प्रभागातून निवडणूक लढवत आहेत. संपूर्ण शहराची धुरा सांभाळून विनायक रत्नपारखी स्वतःच्या प्रभागात काल दाखल झाले. काल सायंकाळी प्रभागातील कालिका देवी मंदिरात त्यांच्या प्रचार यंत्रणेचा नारळ वाढवून शुभारंभ करण्यात आला यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते डॉक्टर प्रकाश आनंदगावकर ,भाजपा ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर नाना मेंडके, प्रशांत पाटील, भागवतकर आबादेव जोशी भारतीय जनता पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार संध्याताई मेंडके तालुकाध्यक्ष रुपालीताई कचरे दुसरे तालुकाध्यक्ष डॉक्टर अभिजीत सोळंके, महिला आघाडी मा.तालुकाध्यक्ष गौरीताई देशमुख छायाताई कुलकर्णी यांच्यासह भाजपचे सर्व उमेदवार उपस्थित होते. याप्रसंगी कालिकादेवी मातेला श्रीफळ अर्पण करून प्रचाराची सुरुवात झाली . याप्रसंगी डॉक्टर आनंदगावकर म्हणाले संध्या मेंडके या माजलगाव नगरपालिकेला नगराध्यक्ष पदासाठी भारतीय जनता पार्टी कडून निवडणूक लढवत आहेत संध्या मेंडके ह्या उच्च विभूषित अतिशय हुशार आहार तज्ञ म्हणून नावलौकिक असणाऱ्या आहेत. तसेच विनायक रत्नपारखी यांच्याशी बोलताना म्हणाले डॉ. आनंदगावकरांनी विनायक रत्नपारखी यांच्यासारखा चारित्र संपन्न , लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकापर्यंत आदर करणाऱ्या, विनयशील , निर्व्यसनी व सामाजिक

◆ पान ४ वरून पुढे...

कार्य करणाऱ्या व्यक्तीला जनतेने पुन्हा एकदा संधी द्यावी असे आवाहन त्यांनी केले. ,या प्रसंगी अनेक पदाधिकारी यांची संयोजित भाषणे केली यानंतर प्रभागातून प्रचार रॅली काढण्यात आली घरोघर विनायक रत्नपारखी दांपत्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले यावेळी प्रभागातील लोकांचा उत्साह ओसंडून वाहत होता.

## मा. शिवसेना जिल्हाप्रमुख...

जाऊन सांत्वनपर भेट दिली. यावेळी सोबत पिंपळादेवीचे सरपंच दत्ताजी किंवणे, आनंदजी घुमरे, युवा नेते अश्विनजी लांडे पाटील, ज्ञानेश्वर चिंचकर, सुशील दुबाले,अंकुश निकम, माऊली लांडे तसेच सर्व उपस्थित होते. भावपूर्ण श्रद्धांजली. मौजे शहाजनपुर येथील बाळासाहेबजी मते यांच्या वडिलांचे काही दिवसांपूर्वी दुखःद निधन झाले असता शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी आज त्यांच्या राहत्या घरी सांत्वन पर भेट दिली. यावेळी सोबत युवा नेते अश्विनजी लांडे, भागवतरावजी मते,बंडूजी सपकाळ, प्रविण मते,सुरज मते, सुशील दुबाले सह सर्व उपस्थित होते.

## बीड नगरपरिषदेवर ...

घेऊन, बीड नगरपरिषदेवर भाजपाचा झेंडा फडकावण्यासाठी सर्वांनी ताकतीने काम करावे असे आवाहन करण्यात आले. यावेळी प्रा. देविदास नागरगोजे, गणेशजी लांडे, पालसिंगणकर काका, डॉक्टर अभय वनवे, शांतिनाथ डोरले, सलीमजी जहागीर, अनिल चांदणे, चंद्रकांत फड, भूषण पवार, विलास बामणे, ज्योतिबा ननवरे, नूरलाला, बालाजी पवार, गणेश पुजारी, दत्ता परळकर, थिगळे साहेब,अमोल वडतीले, राजू शहाणे, सलीम अत्तर, महादेव नागरगोजे, हरीश खाडे, भालचंद्र कुलकर्णी, केशव बडे, मीराताई गांधी, जयश्रीताई मुंडे, संगीताताई धसे, शितलताई राजपूत, प्रीतताई कुकडेजा, संध्याताई मिश्रा, शैलजाताई मुसळे, लताताई मस्के, स्नेहाताई, माळी यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## पन्नगेश्वर शुगर...

कारखान्यातील सर्व अधिकारी, कर्मचारी व शेतकरी उपस्थित होते. हंगामाच्या सुरुवातीचा पहिला टप्पा असलेला अग्निप्रदीपन समारंभ सुरळीतपणे पार पडल्याने गळीत हंगामाची सुरुवात यशस्वी होण्याबद्दल कारखाना परिसरात समाधान व्यक्त होत आहे. ऊस पुरवठा साखळी, प्रक्रिया यंत्रणा आणि उत्पादन व्यवस्थापनाची पूर्वतयारी पूर्ण असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. शेतकऱ्यांचा सहभाग आणि कारखाना कर्मचाऱ्यांचे योगदान अधोरेखित करत यावर्षीचा हंगाम अधिक उत्पादनक्षम व सुरळीत राहील, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

## अखेर लिंबागणेश...

ठिकाणी बोर्डावर रस्ता दोन वर्षांपूर्वीच झाल्याचे नमूद असूनही प्रत्यक्षात रस्त्याची अवस्था अत्यंत खराब आहे. कंत्राटदार दुरुस्ती कालावधीतील तफावतीचा गैरफायदा घेत कालावधी संपला असे सांगून जबाबदारी झटकत असून ग्रामस्थांची व शासनाची दिशाभूल करत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला. ग्रामस्थांनी सजग राहून अशा कामांवर देखरेख ठेवण्याचे आवाहनही त्यांनी केले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ‘ॲग्रो व्हिजन’ कृषी प्रदर्शनास भेट





**नागपूर । प्रतिनिधी**

मध्य भारतातील शेतकऱ्यांच्या आकर्षणाचे केंद्र ठरलेल्या आणि नागपुरात मागील तीन दिवसांपासून सुरु असलेल्या ‘ग्रो व्हिजन -२०२५’ या कृषी प्रदर्शनीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी दुपारी भेट दिली. या भेटीत त्यांनी प्रदर्शनीतील कृषी उत्पादने आणि पूरक उद्योगांच्या दालनांची पाहणी करून शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाबाबत माहिती जाणून घेतली. यावेळी ‘ग्रो व्हिजन’ कृषी प्रदर्शनाच्या कार्यालयात आयोजित छोटेखानी कार्यक्रमात या प्रदर्शनाचे प्रणेते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, बारामती ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे विश्वस्त प्रतापराव पवार, ॲग्रो व्हिजन फाऊंडेशनचे अध्यक्ष रवी बोरटकर तसेच ॲग्रो व्हिजन सल्लागार परिषदेचे चेअरमन डॉ. सी. डी. मायी हे मान्यवर उपस्थित होते. ॲग्रो व्हिजनचे हे आतापर्यंतचे सोळावे प्रदर्शन आहे. याशिवाय फाऊंडेशनला १० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल तयार करण्यात आलेल्या कॉफी टेबल बुकचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन झाले. या कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रदर्शनातील विविध संस्था आणि कंपन्यांच्या दालनांना भेट दिली. विशेषतः मुख्यमंत्र्यांनी शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाबाबत माहिती जाणून घेतली.

# जन्मदात्या वडिलांची हत्या करुन घरातच मृतदेह पुरला; ८ दिवसांनी घरातीलच व्यक्तीमुळं बिंग फुटलं

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगरमध्ये नात्याला काळिमा फासणारी एक घटना उघडकीस आली आहे. किरकोळ कारणावरुन पोटच्या मुलानेच जन्मदात्या वडिलांची हत्या केली आहे. पैठण तालुक्यातील कडेठाण येथे ही घटना घडली असून या प्रकाराने एकच खळबळ उडाली आहे.

आरोपी मुलाने आपल्याच वडिलांची हत्या करून त्यांचा मृतदेह घरातच पुरला होता. त्यानंतर घरात उग्र वास येत असल्याने ८ दिवसांनंतर घरात खोदकाम करण्यात आले. तेव्हा हे प्रकरण उघडकीस आलं आहे. कल्याण काळे असं मयताचं नाव





आहे. तर राम असं आरोपी मुलाचं नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुलगा आणि वडील दोघांमध्ये किरकोळ गोष्टीवरुन वाद झाला. मात्र नंतर हा वाद इतका टोकाला गेला की मुलाने धारदार शस्त्राने वडिलांवर वार करत त्यांची हत्या केली. इतकंच नव्हे तर हा प्रकार बाहेर कोणालाही कळू नये यासाठी त्याने आईलाही धमकी देत गप्प राहण्यास सांगितले. धक्कादायक म्हणजे, मुलाने घरातच खड्डा पुरत वडिलांचा मृतदेह पुरला होता.

वडिलांच्या हत्येनंतर घटनेच्या ८ दिवसांनंतर घरातून प्रचंड उग्र वास सुटल्यानंतर ही बाब समोर आली. घरात उग्र वास सुटल्यानंतर कल्याण यांच्या पत्नीने ही बाब दिराला सांगितली. त्यानंतर त्यांनी सरपंचला सांगितले त्यानंतर पोलिसांना कळवण्यात आले. पोलिसांनी घरात खोदकाम करून मृतदेह बाहेर काढला. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी राम काळे याला अटक केली आहे. मृतदेहाचे जागेवरच शवविच्छेदन करण्यात आले. तसंच, त्या रात्री विधीवत अंत्यसंस्कारदेखील करण्यात आले. रिक्षामध्ये मृतदेह सापडल्याने खळबळ

मीरा- भाईंदरमधील काशिमिरा पोलीस स्टेशन हद्दीत धक्कादायक घटना घडली आहे. एका प्रायव्हेट कंपनीत कार्यरत असलेल्या इसमाचा मृतदेह रिक्षामध्ये आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. माहिती मिळताच काशिमिरा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि मृतदेह पंचनामा करून शवविच्छेदनासाठी डॉ. भीमसेन जोशी रुग्णालयात पाठवला आहे. हा प्रकार घातपाताचा की नैसर्गिक मृत्यूचा या दोन्ही शक्यतांचा तपास पोलीस सखोलपणे करत असून अहवालाची प्रतीक्षा आहे.

# प्रशासनाने विस्थापित प्रा. पदवीधरांची माहे अक्टोबर पासूनची वेतन व्यवस्था तात्काळ करावी : जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी

**बीड । प्रतिनिधी**



जिल्हा अंतर्गत बदली नंतर विस्थापित झालेल्या दीडशे प्राथमिक पदवीधरांची तात्काळ पगार व्यवस्था उपलब्ध रिक्त पदावरून करून ,माहे ऑक्टोबर पासून निर्माण होणारा वेतनाचा प्रश्न तातडीने सोडवावा,अशी मागणी प्रहार चे जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांच्या कडे निवेदनाद्वारे नुकतीच केली आहे, अशी माहिती जिल्हा सरचिटणीस अविनाश काळे यांनी दिली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,जिल्हा अतंर्गत बदल्या होऊन दोन महिने व कार्यमुक्ती होऊन महिना झाला आहे आणि माहे ऑक्टोबरचे वेतन बिलांची तयारी सुरू होत असून देखील अद्याप जिल्हा अतंर्गत बदली मध्ये अनुषंगिक विषयांची पदे उपलब्ध नसल्याने साधारणपणे दीडशे प्राथमिक पदवीधर शिक्षक विस्थापित झालेल्या प्राथमिक पदवीधरांची पगार व्यवस्था अद्याप करण्यात आलेली नसल्याचे प्रहार जिल्हा उपाध्यक्षा श्रीमती वैशाली आकुसकर, श्रीमती अर्चना नाथ, श्रीमती वर्षा महाजन,पी आर खेडकर, अंबेजोगाई अध्यक्ष बाळासाहेब पिसुरे व सचिव रामसिंग बेले , माजलगाव अध्यक्ष लक्ष्मण सरवदे,परळी तालुकाध्यक्ष कमलाकर कामाळे, केज अध्यक्ष प्रभुकांत सोन्ने, गेवराई अध्यक्ष बाळासाहेब गावडे, शिरूर अध्यक्ष दत्तात्रय गाडेकर, व सर्व प्रहार पदाधिकारी यांनी जिल्ह्यात घेतलेल्या आढाव्यात स्पष्ट झालेले आहे. म्हणूनच माहे ऑक्टोबरचे वेतनापासून विस्थापित प्राथमिक पदवीधरांना वंचित रहावे लागू नये,

# विद्यार्थ्यांनी सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारून स्पर्धात्मक विषयांवर भर द्यावा : डॉ. लक्ष्मण उलगडे

**बीड । प्रतिनिधी**

उदगीर (जि. लातूर) येथील जी. बी. पाटील स्कूल ऑफ नर्सिंग आणि गोविंदराव पाटील अध्यापक (डीएड, बीएड) महाविद्यालयात दिनांक २२ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित सांस्कृतिक महोत्सव व अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात पार पडला.



कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे संचालक प्रा. उदयसिंह पाटील, संचालिका सौ. शुभांगी पाटील, प्राचार्य प्रा. संजय स्वामी, तसेच उद्घाटक आणि प्रमुख पाहुणे म्हणून श्री हावगीस्वामी महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ. लक्ष्मण उलगडे उपस्थित होते. प्राचार्य प्रा. शीतल कदम (जीएनएम), प्रा. अश्विनी, प्रा. सुशांत शिंदे, प्रा. बिरादार आदी मान्यवरांनीही कार्यक्रमाची शोभा वाढवली.कार्यक्रमाची सरुवात दीपप्रज्वलन आणि कै. गोविंदराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. प्रमुख पाहुणे डॉ. लक्ष्मण उलगडे यांचा सत्कार प्रा. उदयसिंह पाटील यांच्या हस्ते ग्रंथ व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. त्यानंतर सर्व मान्यवरांचा सन्मान प्राचार्य प्रा. संजय स्वामी यांनी केला. मार्गदर्शन करताना डॉ. उलगडे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी सकारात्मक दृष्टिकोन आत्मसात करून स्पर्धात्मक विषयांवर अधिक भर द्यावा. सखोल अभ्यास, परिश्रम आणि सांस्कृतिक, सामाजिक व आरोग्य सेवा उपक्रमात सहभागी झाल्यास सर्वांगीण विकास साधता येतो. महिला नेतृत्वाच्या उदाहरणाद्वारे त्यांनी विद्यार्थिनींना प्रोत्साहित करताना भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, विद्यमान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, तसेच कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांची कामगिरी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. जीएनएम व आरएनएम कोर्समुळे विद्यार्थिनींना जनआरोग्य सेवेत कार्य करण्याची संधी मिळते, तसेच डीएड-बीएडच्या माध्यमातून आदर्श शिक्षक होऊन समाजात महत्त्वाचे योगदान देता येते, असेही त्यांनी सांगितले. शिक्षक हा समाजाचा आरसा आणि विद्यार्थ्यांसाठी योग्य दिशा देणारा आधारस्तंभ आहे, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास नर्सिंग (आरएनएम, जीएनएम), डीएड व बीएड विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. शीतल कदम यांनी केले, प्रास्ताविक प्रा. सुशांत शिंदे यांनी तर आभारप्रदर्शन प्राचार्य प्रा. संजय स्वामी यांनी केले.

# पुढचे तीन दिवस थंडी गायब होणार! राज्यातील 'या' जिल्ह्यांत पावसाचा इशारा

**मुंबई । प्रतिनिधी**

नोव्हेंबर महिन्यापासून राज्यात थंडीचा कडाका सुरू झाला आहे. राज्यातील बहुतांश भागात तापमानाचा पारा घसरला असून थंडीचा लाट आली आहे. उत्तर महाराष्ट्र व विदर्भ गारठला आहे. मात्र असे असतानाच ऐन थंडीच्या हंगामात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.




उत्तरेकडील थंड वाऱ्यांचे प्रवाह कमी झाल्याने थंडीची लाट ओसरली आहे. त्यामुळं राज्यात पावसाला पोषक हवामान मिळाले असून काही राज्यात हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसंच, गारठा कमी होण्याचीदेखील शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. कोकण, मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. तसंच, कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रात आकाश ढगाळ होत आहे. दक्षिण अंदमान समुद्रात शनिवारी कमी दाब क्षेत्राची निर्मिती झाली. वायव्येकडे सरकताना या प्रणालीची तीव्रता आणखी वाढणार आहे. त्यामुळं दक्षिण भारतासह, मध्य महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील जिल्ह्यात पावसाला पोषक हवामान झाले आहे. आकाश ढगाळ होत असून राज्यातील थंडीची लाट ओसरू लागणार आहे. ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सातारा, सांगली कोल्हापूर या जिल्ह्यात विजांसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसंच, कोकणात सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सांगली जिल्ह्यात काही ठिकाणी विजांसह हलक्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. यामुळं पुढील ३ दिवस थंडी काहीशी कमी राहू शकते, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. तापमानात किंचितशी वाढ झाल्यामुळे हाडे गोठवणाऱ्या थंडीपासून नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

# प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन हॉलीबॉल स्पर्धा उत्साहात संपन्न



**नेकनूर । प्रतिनिधी**

बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, नेकनुर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर महाविद्यालयीन मुले हॉलीबॉल स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. महाविद्यालयामध्ये दोन दिवस चाललेल्या आंतर हॉलीबॉल स्पर्धासाठी पंधरा संघांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचा समारोप दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी झाला. या स्पर्धेत लोकमान्य टिळक महाविद्यालय, वडवणी यांनी प्रथम क्रमांक पटकावला तर दगडूजीराव देशमुख महाविद्यालय, वाळूज यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. समारोप कार्यक्रम प्रसंगी अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ.डी के.ढास उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अभिजीतसिंह दिखत प्रा. डॉ. गोविंद कदम, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.कृष्णा जाधव सर डॉ.निंबाळकर डॉ. पवार डॉ. सानप,अनवर सर आदी मान्यवर उपस्थित होते.अध्यक्षपदावरून बोलताना डॉ.ढास डी.के.सर म्हणाले की आम्हाला हॉलीबॉल स्पर्धेचे यजमानपद दिल्याबद्दल विद्यापीठाचे आभार व्यक्त केले. विजेत्या व उपविजेता संघास शुभेच्छा देऊन, प्राचार्य व डॉ. श्रीकृष्ण जाधव यांच्या हस्ते करंडक व प्रमाणपत्र देऊन खेळाडूंचा सन्मान करण्यात आला.

# मुंबई-नाशिक महामार्गावर कारचा भीषण अपघात दोन जणांचा जागीच मृत्यू तर एक जण गंभीर जखमी

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई नाशिक महामार्गावर कारचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. मुंबई-नाशिक महामार्गावरुन एक वॅगनार कार भरधाव वेगाने जात असताना चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने हा अपघात झाला आहे. या घटनेमुळं परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



दरम्यान, घटनेनंतर शहापूर पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले होते. दरम्यान, या संपूर्ण घटनेचा अधिकचा तपास शहापूर पोलीस करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, या अपघातात १) मयुरेश विनोद चौधरी वय २९ रा. तानसा २) जयेश किसन शेंडे वय २५ रा. उंबरखाड यांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर हर्षल पांडुरंग जाधव वय २९ रा. पेंढरघोळ हा गंभीर जखमी असून उपचारासाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघात ऐवढा भयानक झाला आहे की कार ने रस्त्याच्या कडेला असलेल्या सरक्षित भिंतीच्या कठड्याला जोरदार धडक देऊन ४० ते ५० फूट लांब जाऊन डिव्हायडरवर आदळली. यामुळं कारच्या पुढील दोन्ही एअरबॅक ओपन झाल्या आणि कार मधील प्रवाश्यांना जब्बर मार लागल्याने दोघांचा मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला आहेत. सध्या या संपूर्ण घटनेचा तपास शहापूर पोलीस करीत आहे.

# १३ वर्षीय अल्पवयीन मुलीनं गळफास घेतला

**नागपूर । प्रतिनिधी**

मोबाईलसाठी रागावल्याने तेरा वर्षीय मुलीने आत्महत्या केल्याची धक्कादायक माहिती समोर आहे. मोबाईल दिला नाही म्हणून नागपूर जिल्ह्यातील चणकापूर येथील जय भोले नगर परिसरात तेरा वर्षीय दिव्या सुरेश कोठारे या आठवीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. संध्याकाळी साडेसातच्या सुमारास दिव्याने मोबाईल मागितला. इंस्टाग्राम आणि व्हाट्सअप सारखी सोशल मीडिया ॲप ती नियमित वापरत होती. मोबाईलचा अतिवापर तिच्याकडून होत असल्याने अभ्यासाकडे तिचे दुर्लक्ष होत असल्याने मोबाईल कमी वापर, अभ्यासाला प्राधान्य दे असा तगादा दिव्याकडे लावत होते.शुक्रवारी घटनेच्या दिवशी आत्याच्या घरी लग्न सर्व कुटुंबीय तिकडेच होते. सायंकाळी नेहमीप्रमाणे दिव्याने मोबाईल मागितला, मात्र घरच्यांनी नकार दिला. मोबाईल न दिल्याने दिव्या नाराज झाली. रागाच्या भरात ती आत्याच्या घरातून निघून सरळ स्वतःच्या घरी आली. तेव्हा घरी कुणीच नव्हते. घरात बांधलेल्या पाळण्याच्या दोरीला तिने गळफास घेतला.

# पुस्तकांच्या माध्यमातून वाचनसंस्कृतीला चालना मिळावी: केंद्रीय मंत्री नितीन गडकरी



**नागपूर । प्रतिनिधी**

झपाट्याने बदलत असलेल्या जगात ज्ञान आणि तंत्रज्ञानासोबतच समृद्ध विचारही महत्त्वाचे आहेत. या साऱ्यांचे स्त्रोत पुस्तके आहेत. ज्ञानाचे हे भांडार सर्व ज्ञानशाखात समृद्ध होण्यासमवेत वाचनसंस्कृतीलाही चालना मिळायला हवी, अशी अपेक्षा केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली.

राष्ट्रीय पुस्तक न्यास न्यास आणि झिरो माईल युथ फाऊंडेशनच्या वतीने रेशीमबाग मैदानावर आयोजित नागपूर पुस्तक महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, प्रसिद्ध लेखक अमिश त्रिपाठी, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष प्रो. मिलिंद मराठे आणि झिरो माईल युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष अजय संचेती यांच्यासह अनेक मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती. वाचनसंस्कृती निव्वळ मनोरंजन म्हणून केलेल्या वाचनातून घडत नाही. वाचनात विचार आणि व्यक्तिमत्व घडविण्याचे सामर्थ्य आहे. माझ्या लहानपणी वाचलेल्या अनेक पुस्तकांमधून माझ्या विचारांवर व मनावरही संस्कार घडलेले आहेत. पुस्तकांचा आपल्या विचारांवर, जीवनावर प्रभाव पडतो, ही बाब लक्षात घेतली पाहिजे असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले. आज आमचा देश विश्वगुरु होण्याची मनीषा बाळगतो तो ज्ञानाच्या आधार हे आपण लक्षात घेतले पाहिजे. वाचनातून ज्ञान-तंत्रज्ञानाचा विकास प्रवाहित होतो. नव्या पिढीपर्यंत वाचन संस्कृतीचे बळ पोहोचायला हवे याकडे त्यांनी लक्ष वेधले.

# १४६ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप; महामानव अभिवादन ग्रुपचा उपक्रम


**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील महापुरुषांच्या ९ पुतळ्यांना दररोज पुष्पहार अर्पण करून अभिवादन करणाऱ्या महामानव अभिवादन ग्रुप; डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या ६ डिसेंबर या महापरिनिर्वाणदिनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करतात व सर्व सदस्य विद्यार्थ्यांना वही पेन दान करून, सर्व फुले शाहू आंबेडकर प्रेमींना वही पेन दान करण्याचे आवाहन करतात. ह्या उपक्रमाला सर्व थरातील बीड वासीय व बाहेर वास्तव करणाऱ्या कडून उत्तम प्रतिसाद मिळतो. आलेल्या दानातूनच विविध ठिकाणी वर्षभर शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम व विद्यार्थ्यांकरिता प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे नगर (चांदणे वस्ती),रमाई नगर चौक वस्ती व सम्राट अशोक बुद्ध विहार बलभीम नगर पेठ बीड येथे एकूण १४६ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही पेन) वाटप करण्यात आले सम्राट अशोक बुद्ध विहार येथील मुख्य कार्यक्रमाच्या प्रसंगी महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम भोले सर यांनी मुलांना शिक्षणाचे महत्त्व व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून उच्च शिक्षण घ्यावे असे समजावून सांगितले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक ज्येष्ठ



सदस्य डी.जी वानखेडे यांनी केले तर सूत्रसंचालन डी.एम राऊत यांनी केले. कार्यक्रमास से. नी एलआयसी जिल्हा प्रबंधक यु.एस वाघमारे, से.नी मुख्याध्यापक सदाशिव निसर्गंध, आर.डी चक्रे ॲड तेजस वडमारे यांची प्रमुख उपस्थिती होती आदर्शांचे पुष्प दीप धुपाने पूजन करून सामुदायिक त्रिसरण पंचशील घेऊन, कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेची सामुदायिक वाचन घेतले. व भारतीय लोकशाहित संविधानाचे महत्त्व मुलांना समजावून सांगितले. शिक्षणाशिवाय पर्याय नाही हा बाबासाहेबांचा बहुमोल उपदेश समजल्या मुळे १२ वी ची विद्यार्थिनी साई ठोंबरेने आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की कितीही कष्ट पडले, अडचणी आल्यातरी उच्च शिक्षणातून mpsc - upsc परीक्षेची तय्यारी करून प्रशासकीय सेवेत प्रवेश नक्कीच मिळवील असे ध्येय समोर ठेवले. तिच्या ह्या ध्येयाच्या विचारला व प्रयत्नला प्रत्येकानी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. शिक्षणात येणाऱ्या अडी अडचणी सोडवण्याकरिता महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचल फिरते मोफत वाचनालय सतत पाठीमागे राहिल असे दृढ आश्वासन दिले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ॲड तेजस वडमारे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास प्रेमालताताई, राधाबाई वीर, गोदावरी पटेकर, अल्काताई सुधाकर डोंगरे, राधाबाई गायकवाड, सुवर्णा वाघमारे व परिसरातील विध्यार्थी व पालकांची उपस्थिती होती. अल्पोपहार वाटप करून सरणात्तयने कार्यक्रमाची सांगता झाली.



दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● सोमवार, दि. २४ नोव्हेंबर २०२५ ● पान ४

# जनावरेही खाणार नाहीत असे धान्य माणसांसाठी राशनवर उपलब्ध

### निकृष्ट कीड लागलेले धान्य पुरवठा विभागाकडुन वितरित धान्यात जाळी व कचऱ्याचा समावेश

### गेवराईच्या लोकप्रतिनिधींनी या गंभीर बाबीकडे लक्ष देण्याची अपेक्षा

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यासह तलवाडा येथील स्वस्त धान्य दुकानांमध्ये सध्या वाटप होत आसलेले धान्य अतिशय निकृष्ट दर्जाचे पिवळसर, काळसर, जाळी व कचरा युक्त बुकटी झालेल्या ज्वारीचे वितरण करणे सुरु आहे. ज्वारी सोबत वितरित होणारा तांदुळ जाणकारांच्या मतानुसार



तीन ते चार वर्षे जुना असल्याचे सांगण्यात येत आहे. शासनाच्या आदेशानुसार नविन तांदळाचे वितरण करणे आवश्यक असतांना सर्रास नियमबाह्यपणे जुना तांदूळ व कचरा युक्त तांदूळ वितरीत करण्याचा धक्कादायक प्रकार सुरु आहे, अक्षरशः जनावारेही तोंड लावणार नाहीत असा निकृष्ट तांदूळ व ज्वारी वितरित केला जात असल्याचे गावकरी सांगत असुन पुरवठा विभागाप्रती संतप्त प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होऊ लागल्या असुन जनावरेही खाणार नाहीत अस्या निष्कृष्ट धान्याचे करायचे काय असा सवाल विध्यमान लोकप्रतिनिधींना जनतेतून विचारला जात आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, महाराष्ट्र शासन व प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना अंतर्गत शासकीय स्वस्त धान्य दुकानातून विनामूल्य तांदूळ, गव्हू अथवा ज्वारी हे राशन कार्डधारकांना वितरीत करण्यात येतो. महिन्यांपासून गेवराई तालुक्यासह तलवाडा येथील स्वस्त धान्य दुकानांतून अतिशय निकृष्ट दर्जाचा जुना तांदुळ व जाळ्या कचरा युक्त ज्वारी देण्यात येत ▶▶ उर्वरित पान २ वर

## श्री दत्त जयंतीनिमित्त तलवाडयात किर्तन महोत्सवाचे आयोजन

**तलवाडा प्रतिनिधी**

पावन दत्त मंदिर संस्थान तलवाडा याठिकाणी यावर्षी रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त भव्यदिव्य किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या किर्तन महोत्सवाचा शुभारंभ शुक्रवार दि. २८ नोव्हेंबर पासून हभप नवनाथ महाराज गिरी व हभप गणेश महाराज कचरे यांच्या शुभहस्ते होणार आहे. नामवंत किर्तनकार या किर्तन महोत्सवात आपली किर्तनरूपी सेवा समर्पित करणार आहेत. तरी या किर्तन महोत्सवाचा लाभ तलवाडा व पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी घ्यावा असे आवाहन पावन दत्त मंदिर संस्थान समितीच्या वतीने या संस्थानचे अध्यक्ष - पत्रकार बापू गाडेकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकारद्वारे केले आहे. शुक्रवार दि. २८ नोव्हेंबर ते शुक्रवार दि. ०५ डिसेंबर २०२५ या कालावधीत हा किर्तन ▶▶ उर्वरित पान २ वर

## जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर मिळविलेले यश प्रेरणादायी: आ.सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्यांचा खडतर प्रवास, जिद्द, चिकाटी आणि मेहनत नक्कीच प्रेरणादायी आहे. विशेषतः आपल्या भागातील ऊसतोड मजूर आणि त्यांच्या पाल्याचे खरोखर कौतुक केले पाहिजे कारण कुठलीही गोष्ट साध्य करण्यासाठी एकाग्रता, निष्ठा आणि सातत्य किती महत्त्वाचे असते याचे उत्कृष्ट उदाहरण त्यांनी घालून दिले असल्याचे मत आ.सुरेश धस



यांनी व्यक्त केले. रविवारी महाराष्ट्र लोकसेवा आयोग,राज्यसेवा परीक्षेत यश संपादन करून विविध शासकीय विभागांमध्ये तसेच सुरक्षा दलांमध्ये निवड झालेल्या होतकरू विद्यार्थ्यांचा आ.सुरेश धस यांच्या हस्ते सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.यावेळी महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यसेवा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेले चाहूरवाडी येथील श्री.नितीन भोलाजी खेंगरे यांनी डएइउ प्रवर्गातून ५७३ गुण मिळवत राज्यात १३९ वा क्रमांक मिळवला त्यासोबतच तेजस रोहिदास भराटे यांची ग्राम महसूल अधिकारी पदी आणि शुभम बाळासाहेब माने यांची आरोग्य सेवक पदी निवड झाल्याबद्दल तर भारतीय सैन्य दलात निवड होण्याचा बहुमान ▶▶ उर्वरित पान २ वर

## प्रभाग 6 मधून क्रांती गोस्वामी आणि आकाश कराड यांना बहुमताने विजयी करा : राजकिशोर मोदी

### अपक्ष उमेदवारांच्या अपप्रचाराला बळी पडू नका, आघाडीच्या अधिकृत उमेदवारांनाच काम करण्याची संधी द्या

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई नगर पालिका सार्वत्रिक निवडणुकात प्रभाग ६ मधून आकाश कराड आणि क्रांती गोस्वामी हे लोकविकास महाआघाडीचे अधिकृत उमेदवार असून त्यांनाच आपले बहुमुल्य मत देऊन विजयी करावे आणि सेवेची संधी द्यावी असे आवाहन नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजकिशोर मोदी यांनी केले. काही अपक्ष उमेदवार राजकिशोर मोदी यांचे नाव



वापरून दिशाभूल करत मते मागत असल्याने मोदी यांनी जाहीरपणे याबाबत खुलासा केला.

निवडणूक जवळ आल्याने शहरात राजकीय घडामोडींना वेग आला असून राजकिशोर मोदी यांच्या लोकविकास महाआघाडीला संपूर्ण अंबाजोगाई शहरातून पाठींबा वाढत आहे. मोदी यांच्यासह आघाडीच्या सर्वच उमेदवारांची बाजू भक्कम होत असून लोकविकास आघाडी सत्तेत येणार हे जवळपास निश्चित आहे. प्रभाग ६ मधून लोकविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आकाश कराड आणि क्रांती गोस्वामी यांनाही मोठा जनाधार मिळतो ▶▶ उर्वरित पान २ वर

## वार्ड ७-ब भाजपाचे अधिकृत उमेदवार संतोष सुभाषराव सोळंके आघाडीवर, मतदारांचा विश्वास मिळवणारा चेहरा

### सामाजिक उपक्रम व विकास कामे केल्यामुळे लागणार विजयी गुलाल

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव नगरपरिषद निवडणुकीचा धुरळा चांगलाच उडत असताना प्रभाग क्रमांक ७-ब मध्ये भाजपाचे अधिकृत उमेदवार संतोष सुभाषराव सोळंके यांना जनतेकडून मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत असून वार्डात त्यांची जोरदार चर्चा सुरू आहे.



समाजकार्यातून आणि विकास उपक्रमांतून निर्माण झालेली त्यांची ओळख मतदारांच्या मनात भक्कमपणे रूजली असून विजयाचा गुलाल उधळला जाणार अशा चर्चा प्रभागात रंगू लागल्या आहेत. संतोष सोळंके यांच्या मागे सामाजिक परंपरा व अनुभवाचा मजबूत पाया आहे. त्यांचे वडील सुभाषराव सोळंके हे माजी जिल्हा परिषद सदस्य असून त्यांनी राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात केलेल्या कामाचा प्रभाव अद्यापही मतदारांवर ▶ उर्वरित पान २ वर

## विनायक रत्नपारखी यांच्या प्रचार रॅलीचा शुभारंभ

### प्रभागातील जनतेचा विनम्र चारित्र्यवान उमेदवाराला भरघोस पाठिंबा

**माजलगाव । प्रतिनिधी**

भाजप शहराध्यक्ष विनायक रत्नपारखी यांच्या पत्नी सौ कविता रत्नपारखी माजलगाव शहरातील प्रभाग क्रमांक चार ब मधून नगरपालिका निवडणूक लढवत आहेत त्यांचा काल प्रचाराचा अत्यंत उत्साहात शुभारंभ करण्यात आला. भाजप शहराध्यक्ष



विनायक रत्नपारखी हे प्रभाग क्रमांक चार ब मधील भारतीय जनता पक्षाचे विनम्र विनेशील चारित्र्य संपन्न व मधुरवाणी असे नगरसेवक शहराला लाभले त्यांचा प्रभाग महिलेसाठी राखीव झाल्याने त्यांच्या पत्नी सौ कविता रत्नपारखी या ▶ उर्वरित पान २ वर

## मा. शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांची सांत्वन पर भेट

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद सर्कल मधील मौजे पिंपळादेवी येथील शेतकरी कामगार पक्षाचे नेते बाळासाहेबजी घुमरे,जगन्नाथजी घुमरे व विश्वंभर दादा घुमरे यांच्या आईचे परवा दुःखद निधन झाले असता शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी आज त्यांच्या निवासस्थानी ▶ उर्वरित पान २ वर



## बीड नगरपरिषदेवर भाजपचा झेंडा फडकणार: शंकर देशमुख

### सर्वांनी ताकतीने कामाला लागा : सर्जेराव तांदळे

**● जिल्हा कार्यालयात नियोजन बैठक संपन्न**

**बीड । प्रतिनिधी**

ना. पंकजाताई मुंडे, माजी खा. डॉ. प्रीतमताई मुंडे त्यांच्या आदेशावरून आज भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालयात जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख, ॲड. सर्जेराव तात्या तांदळे, श्री. नवनाथ आण्णा शिराळे, शहराध्यक्ष श्री. अशोक लोढा,



नगर अध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ. ज्योतीताई घुमरे यांच्या प्रमुख उपस्थितीत नगरपरिषद निवडणूक संदर्भात पदाधिकाऱ्यांची नियोजन बैठक संपन्न झाली. सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी डोअर टू डोअर फिरून सरकारची जनसामान्य लोकांसाठी राबवलेली विकास कामे, बीड नगर परिषदेच्या माध्यमातून स्वच्छता, लाईट, पाणी, पार्किंग, महिला सुविधा, आदीसह सबका साथ, सबका विकास हे मा. नरेंद्रजी मोदींचे स्वप्न हाती ▶▶ उर्वरित पान २ वर

## पन्नगेश्र्वर शुगर मिल्स लिमिटेडचा बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ संपन्न

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

पन्नगेश्र्वर शुगर मिल्स लिमिटेड, विमल नगर, पानगाव (ता. रेणापूर, जि. लातूर) येथे सन २०२५-२६ गळीत हंगामातील पहिला बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ मंगळवार, १८ नोव्हेंबर २०२५ रोजी चेअरमन अक्षय मुंदडा यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडला. हंगामाचा शुभारंभ औपचारिकरित्या



करण्यात आला असून उत्पादन प्रक्रियेची तयारी पूर्ण झाल्याचे कारखाना प्रशासनाने स्पष्ट केले. समारंभात राजू भन्साळी, शरद इंगळे, रोहन मुंदडा, रवी भन्साळी, जनरल मॅनेजर व्यंकट वाकडे, चीफ इंजिनीअर, मोरे, काटे, ॲग्री ऑफिसर करपे, चीफ केमिस्ट हेडे, चीफ अकाउंटंट खोसे, ऊस पुरवठा अधिकारी, कार्यालय अधीक्षक, सिव्हिल इंजिनीअर, एचआर विभाग, सिक्युरिटी ऑफिसर तसेच ▶▶ उर्वरित पान २ वर

## अखेर लिंबागणेश-पोखरी-पालवण रस्त्यावरील खड्ड्यांची जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या स्वखर्चातून दुरुस्ती सुरू



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

तत्कालीन ग्रामविकास मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने आणि जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या पाठपुराव्यामुळे तब्बल १३ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या पालवण ते लिंबागणेश या २४ किमी रस्त्याची दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर सर्वत्र पडलेले खोल खड्डे व भगदाडांमुळे नागरिक, शेतकरी, विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. अपघातांचे प्रमाणही वाढले होते.

गेल्या आठवड्यात ग्रामस्थांनी खड्ड्यांमध्ये बेशरमाची झाडे लावून प्रशासन आणि कंत्राटदाराचा निषेध नोंदविला होता. दरम्यान मदन मस्के कन्स्ट्रक्शन, बीड यांनी दुरुस्ती कालावधी संपल्याचे कारण देत जबाबदारी नाकारली होती. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) चे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी सामाजिक बांधिलकी जपत स्वखर्चातून रस्त्यावरील खड्ड्यांचे तात्पुरते डांबरीकरण सुरू केले असून ग्रामस्थांनी या उपक्रमाचे स्वागत करत त्यांचे आभार मानले आहेत.

दुरुस्ती कालावधी संपला, पण ग्रामस्थांची गैरसोय पाहवत नाही - स्वखर्चाने रस्ता दुरुस्ती सुरू : राजेंद्र मस्के

आहेर-धानोरा-वरवटी-लिंबागणेश हा महत्त्वाचा दळणवळणाचा रस्ता अतिवृष्टीमुळे अत्यंत खराब स्थितीत आला होता. खोल खड्डे, पाण्याचे साचलेले तळ, नष्ट झालेले पृष्ठभाग यामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले. शासनाकडून निधी उपलब्ध न झाल्याने ग्रामस्थांच्या दैनंदिन गैरसोयी लक्षात घेऊन स्वखर्चाने दुरुस्तीकार्य सुरू केल्याचे मस्के यांनी सांगितले.

बीड जिल्ह्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणावर निकृष्ट दर्जाचे रस्तेकाम होत असल्याचे प्रत्यक्ष पाहायला मिळते. रस्त्यावरील कामाचा बोर्ड आणि वास्तविक स्थिती यामध्ये मोठी तफावत आहे. अनेक ▶▶ उर्वरित पान २ वर